शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

राज्यशासनाने विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांना पोहचविण्याकरिता विकसित केलेले महाडीबीटी पोर्टल माहे ऑगस्ट २०१८ मध्ये कार्यान्वित झालेले आहे. या प्रणालीची अंमलबजावणी महाआयटी व महाऑनलाईन यांच्या मार्फत करण्यात येत असल्याचे आपणास विदीत आहेच.याअनुषंगाने महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्तीच्या अंमलबजावणीसाठी खुद्द विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांच्या इतर शुल्काबाबत येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करणेसाठी सोबत जोडलेल्या नमुन्यातील २०१० ते २०१९ या कालावधीतील आपल्या महाविद्यालयाशी संबंधित विविध शुल्काची अनुदानित व विनाअनुदानित अभ्यासक्रमांची माहिती दि.२१/०६/२०१९ रोजी पर्यंतच कार्यालयीन वेळेत विद्यापीठास सादर करावी.

**टिप- सदर माहितीची प्रत सॉफ्ट आणि हार्ड कॉपी स्वरूपात या विभागास खास दुतामार्फत व affiliation.t२@unishivaji.ac.in या ईमेलवर सादर करणे आवश्यक असून जी महाविद्यालये याबाबतची माहिती सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांचे शिष्यवृत्तीबाबतचे कोणतेही कामकाज केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

सोबत- वरीलप्रमाणे

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही.एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 331
दिनांक- 20 JUN 2019

E:\Sm\Circular\Circular.docx